GR 200407261730046001-0500
~~GR 20040726164738001~~-0500

कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर पूर्णवेळ
जागा झाल्यास त्या ठिकाणी काम
करणा-या अर्धवेळ शिक्षकाची पूर्णवेळ
शिक्षक म्हणन नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. एचएससी-१३९९/(२३६६/९९)/उमाशि १.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.
दिनांक:-39 जानेवारी, २००१.
संदर्भ क्र.शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.
एचएससी/ १५९५/१७५२०/१२ एचएस/दि. २७.११.९६ चे पत्र.

**शासन परिपत्रक:-** कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर शिक्षकाची पूर्णवेळ जागा निर्माण झाल्यास त्या ठिकाणी काम करणा-या अर्धवेळ शिक्षकाची नियुक्ती पूर्णवेळ शिक्षक म्हणून करण्याबाबचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. आता खाली नमूद केलेल्या अटींना अधिन राहून अर्धवेळ शिक्षक कार्यरत असलेल्या ठिकाणी कार्यभार वाढल्यामुळे पूर्णवेळ शिक्षकाचे पद निर्माण झाल्यास त्याठिकाणी कार्यरत अर्धवेळ शिक्षकास पूर्णवेळ शिक्षक म्हणून नियुक्त करण्यात यावे.

१) एकाच संस्थेत अर्धवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्याच संस्थेत पूर्णवेळ पद निर्माण झाल्यास विषय साधर्म्य व मागासवर्गिय आरक्षण ही तत्वे पाळून, त्या पदावर कार्यरत असलेल्या "अर्धवेळ शिक्षकाची" "पूर्णवेळ शिक्षक" म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

२) संस्थेत निर्माण झालेले पद आरक्षणानुसार राखीव पद ठरत असल्यास व अर्धवेळ शिक्षक खुल्या प्रवर्गातील असल्यास त्यास पूर्णवेळ शिक्षकाच्या पदावर उन्नत करता येणार नाही. मात्र आरक्षणानुसार येणा-या संवर्गातील अर्धवेळ शिक्षक असल्यास, पूर्णवेळ शिक्षकाच्या पदी त्याची नियुक्ती करता येईल.